07-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/06/2025 10:11 PM Page 1



## निवडक

### काणकोण शिमगोत्सव समितीची आज सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ६**: काणकोण शिमगोत्सव समितीच्या सर्व सभासदांची व पदाधिकाऱ्यांची विशेष सभा उद्या शुक्रवार दि.७ मार्च रोजी संध्याकाळी ३ वाजता नगर्से येथील आपत्कालीन आसरा सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. यंदा शासकीय शिमगोत्सव दि. २४ मार्च रोजी काणकोणमध्ये होणार आहे. या शासकीय शिमगोत्सवाच्या आयोजनावर सविस्तर चर्चा करण्यात येणार असून, शिमगोत्सव मिरवणूक यशस्वी करण्यासाठी उपसमित्या निवडण्यात येणार आहे. त्याचबरोबर ऐनवेळी उपस्थित होणार असलेल्या विषयांवर अध्यक्षाच्या परवानगीने चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

---

### हळर्ण येथे उद्या 'भक्ती महिमा'

■ टीम दैनिक हेराल्ड

**हळर्ण, दि. ६** : हळर्ण येथील श्री सातेरी मंदिरात शनिवार दि ८ मार्च रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. सकाळी १० वाजता सत्यनारायण महापूजा होईल. त्यानंतर आरती, तीर्थप्रसाद आणि महाप्रसाद होणार आहे. दुपारी ३ वाजता जागतिक महिला दिनानिमित्त ओम कला सांस्कृतिक केंद्र– हळर्ण प्रस्तुत खेळ खेळूया पैठणीचा हा रंगतदार कार्यक्रम होणार असून प्रसिद्ध निवेदक बादल चौधरी हे निवेदन करतील. संध्याकाळी ६.३० वाजता बलिदान मास – छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित माहितीपट सादर केला जाईल. रात्री ८ वाजता ग्रामस्थांचा सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम होणार आहे. ९.३० वाजता भक्ती महिमा हा नाट्यप्रयोग सादर केला जाईल.

---

### अबू आझमींचा बांदा येथे तीव्र निषेध

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. ६** : औरंगजेबाचे उदात्तीकरण करणारे वक्तव्य करणारे समाजवादी पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार अबू आझमी यांचा बांदा हिंदू एकता मंच व बांदा ग्रामस्थ यांनी प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त केला. आझमी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना औरंगजेब उत्तम प्रशासक होता, असे त्याची भलावण करणारे आणि छत्रपती संभाजी महाराजांबाबत वादग्रस्त वक्तव्य केले त्याचे पडसाद पूर्ण राज्य भर पसरले आहेत. बांदा येथेही अब्बु आझमी यांच्या व्यक्तव्याचा निषेध व्यक्त करण्यात आला.

# नव्या शैक्षणिक वर्षासाठी एससीईआरटी सज्ज..!

## इयत्ता चौथी ते आठवी पर्यंतची पुस्तके दाखल | दहावीच्या शिक्षकांसाठी प्रशिक्षण : संचालिका शेटगावकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**केपे, दि. ६** : एप्रिल २०२५ पासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. या शैक्षणिक वर्षासाठी एससीईआरटी (राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद) सज्ज असून इयत्ता चौथी ते आठवी पर्यंतची पुस्तके त्या–त्या तालुक्यातील बीआरसीसी केंद्रात दाखल झाली असल्याची माहिती एससीईआरटीच्या संचालिका मेघना शेटगावकर यांनी दिली. डिचोली, बार्देश, पेडणे, तिसवाडी, मुरगाव, केपे, सांगे, सासष्टी या तालुक्यांमध्ये असणाऱ्या बीआरसीसी केंद्रात पुस्तके पोहोचली असून शाळांनी ती ताब्यात घ्यावीत या संदर्भातले परिपत्रक लवकरच निघणार असल्याची माहितीही यावेळी मेघना शेटगावकर यांनी दिली. अन्य तालुक्यांतही लवकरच पुस्तके पोहोचतील, असे त्यांनी सांगितले.

यंदा इयत्ता सहावीच्या वर्गासाठी नवे शैक्षणिक धोरण लागू होणार असून इयत्ता सहावीच्या वर्गाची पुस्तकेही त्या–त्या तालुक्यातील बीआरसीसी केंद्रात दाखल झाली आहेत, अशी माहितीही संचालिका मेघना शेटगावकर यांनी दिली. इयत्ता पहिली, दुसरी आणि तिसरीची पुस्तकेही नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या अगोदर मिळतील, असे त्या म्हणाल्या.

**दहावीच्या शिक्षकासांठी ब्लॉकस्तरीय प्रशिक्षण**

दहावीच्या शिक्षकांसाठी ब्लॉकस्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन १ मार्च ते १५ मार्च या दरम्यान आयोजित केले असून सुमारे ५५०० शिक्षकांना कोंकणी, मराठी, इंग्रजी, हिंदी, सामाजिक विज्ञान, शारीरिक शिक्षण, विज्ञान आणि गणित या विषयांसाठी प्रशिक्षण दिले जात आहे. शिक्षकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून एससीईआरटीने नऊ तालुक्यांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे. यामध्ये पेडणे, बार्देस, तिसवाडी, मुरगाव, सासष्टी, काणकोण, डिचोली, सत्तरी,फोंडा, धारबांदोडा, सांगे आणि केपे तालुक्यांचा समावेश आहे, असे त्या म्हणाल्या.

**लवकरच इयत्ता सहावीच्या वर्गासाठी शिक्षकांना प्रशिक्षण**

नव्या शैक्षणिक वर्षात एनईपीची अंमलबजावणी इयत्ता सहावीच्या वर्गासाठी केली जाणार असून त्यानुसार टप्प्याटप्प्याने लवकरच शिक्षकांसाठी प्रशिक्षण सत्र आयोजित केले जाईल. या प्रशिक्षणात नवीन पाठ्यपुस्तकांचा वापर करून प्रभावी अध्यापन आणि क्षमता आधारित मूल्यांकनावर लक्ष केंद्रित केले जाईल, असेही शेटगावकर यांनी सांगितले.




केरे : केपे तालुक्यातील बीआरसीसी केंद्रात दाखल झालेल्या पुस्तकांसोबत एससीईआरटीच्या अधिकारी मनीषा कुलकर्णी. सोबत कर्मचारी.

---

# संगीताचे विद्यार्थी हे कलेचे उपासक

**प्राचार्य गजानन मांद्रेकर : गोवा संगीत महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ६** : संगीताचे विद्यार्थी हे कलेचे आणि संगीताचे उपासक असतात. शिकविणे ही आपली शिक्षण पद्धती नसून शिकणे ही आपली शिक्षण पद्धती आहे, असे प्रतिपादन माजी प्राचार्य गजानन मांद्रेकर यांनी केले. गोवा संगीत महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शशांक मक्तेदार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात 'हे देवी शारदे' या ईशस्तवनाने झाली. यामध्ये रोहित पांचाळ, ध्रुव सतरकर, जानवी शिरगावकर, प्राप्ती पाटील, सेजल नाईक यांनी सहभाग घेतला. त्यांना उपेंद्र साळगावकर, आदित्य तारी, मयुरेश तांबोस्कर व रितेश नाईक यांची संगीतसाथ लाभली. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य शशांक मक्तेदार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ.शिल्पा दुबळे परब यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. सूत्रसंचालन प्रा.गुरुदास गावकर आणि प्रा. रुद्राक्ष वझे यांनी केले. तर आभार डॉ. उदय कुलकर्णी यांनी मानले.

प्राजक्ता परब आणि अनिकेत ठाणेकर या विद्यार्थ्यांनी ताल एकतालमध्ये तबला सहवादन सादर केले. त्यांना उपेंद्र साळगावकर यांनी नगमा साथ दिली. अलिशा सीमेपुरुषकर यांनी राग विभास व होरी सादर केला. त्यांना तबलासाथ महेश वझे, संवादिनी साथ प्रसाद गावस यांनी दिली. संवादिनी सहवादनावर शुभंकना फडते, भिकाजी नरोजी, समीर पेडणेकर यांनी राग तोडी सादर केला. त्यांना तबला साथ गौरव गावस यांनी दिली. प्रा. विक्रांत नाईक यांनी गौड सारंग आणि राग दुर्गा सादर केला. त्यांना तबला साथ स्वप्नील मांद्रेकर तर संवादिनी साथ दत्तराज म्हाळशी यांनी दिली.

**विद्यार्थ्यांना गायन वादनाची संधी : प्राचार्य मक्तेदार**

वार्षिक स्नेहसंमेलन हे महाविद्यालयातील कोणत्याही वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय क्षण असतो. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणाऱ्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना गायन वादनाची संधी दिली जाते, असे उद्गार यावेळी प्राचार्य शशांक मक्तेदार यांनी काढले.



पणजी : स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करताना माजी प्राचार्य गजानन मांद्रेकर. सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य शशांक मक्तेदार, डॉ. उदय कुलकर्णी, प्रकाश देसाई व इतर मान्यवर.

# साखळी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन

## विविध स्पर्धांचे आयोजन | मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ६** : कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील मराठी विभाग आणि पणजी येथील गोवा मराठी अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने साखळी सरकारी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष अनिल सामंत, उपप्राचार्य डॉ. शरद जमखंडी, मराठी विभागाच्या प्रमुख डॉ. स्नेहा महांबरे, गोव्यातील सुप्रसिद्ध संगीतकार दीपक मणेरीकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. रमा बर्वे यांनी गायलेल्या मराठी भाषा गौरव गीताने झाली. विभाग प्रमुख स्नेहा प्रभू महांबरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. चंद्रमाला राणे यांनी प्रमुख पाहुण्याची ओळख करून दिली. सूत्रसंचालन प्रा. सुशा होंडकर यांनी केले. तर आभार प्रा.रमा बर्वे यांनी मानले.

यावेळी .प्रमुख पाहुणे गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्राचार्य अनिल सामंत यांनी मराठी भाषेचे महत्त्व, तिला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा आणि आजच्या तरुणांच्या दृष्टिकोनांना आकार देण्यात कुसुमाग्रजांच्या कवितेचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना संबोधित केले.

प्रो.डॉ. स्नेहा महांबरे यांनी मराठी भाषा दिनाचे महत्त्व अधोरेखित करून कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. तर प्रा. श्रीया टेंगसे यांनी संपूर्ण स्पर्धांचे काटेकोर आणि नीटनेटकेपणाने आयोजन केले.

**स्पर्धांच्या मांदियाळीत विद्यार्थी चमकले..!**

पत्रलेखन स्पर्धेत भावार्थ धोंड, इरफान बोकरे, वंश परब, काव्य चित्र स्पर्धेत भावार्थ धोंड, सुरेखा वरंदेकर, इरफान बोकरे, कथाकथन स्पर्धेत इरफान बोकरे, भावार्थ धोंड, सर्वज्ञ चोडणकर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावले. एकल गायन स्पर्धेत सर्वज्ञ चोडणकर, दिशा परवार, दिया चोर्लेकर यांनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. प्रश्नमंजूषा स्पर्धेत भावार्थ धोंड आणि प्राजक्ता नातू (प्रथम), शर्वणी म्हैसकर, सानिका बर्वे (द्वितीय), अदिती गर्दे, दिया चोर्लेकर (तृतीय), शब्दकोडे स्पर्धेत सई उमरये, सुरेखा वरंदेकर यांनी प्रथम, हेमा मराठे आणि तन्वी भातवडेकर यांनी द्वितीय क्रमांक, वंश परब आणि श्रीराम टेंगसे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. मराठी म्हणी लेखन स्पर्धेत तन्वी भातवडेकर, इरफान बोकरे, भाग्यश्री आजगावकर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावले.



साखळी : गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्राचार्य अनिल सामंत यांच्यासोबत मराठी महाविद्यालयाच्या विभागप्रमुख डॉ. स्नेहा महांबरे, प्रा.श्रीया टेंगसे व इतर प्राध्यापक वर्ग.

---

# २५ वर्षांपूर्वीच्या पराभवाची भारत परतफेड करणार?

## न्यूझीलंडविरुद्ध ९ रोजी रंगणार महामुकाबला | भारताला ३ वेळा चॅम्पियन होण्याची संधी हुकली

**दुबई, दि. ६** : २००० या सालानंतर पहिल्यांदा भारत आणि न्यूझीलंड यांच्यात चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचा फायनल सामना रंगत आहे. दोन्ही संघादरम्यान ९ मार्चला दुबईच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये सामना रंगणार आहे. जेव्हा दोन्ही संघ शेवटचे चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये आमनेसामने आले होते तेव्हा टीम इंडियाला हरवत किवी संघाने खिताब जिंकला होता. लाहौरच्या गद्दाफी स्टेडियममध्ये न्यूझीलंड विरुद्ध साऊथ आफ्रिका यांच्यात खेळवण्यात आलेल्या दुसऱ्या सेमी फायनल सामन्यात न्यूझीलंडने ५० धावांनी विजय मिळवला. आता फायनलमध्ये न्यूझीलंड भारताशी विजेतेपदासाठी भिडणार असून या ब्लॉकबस्टर सामन्यात न्यूझीलंडकडून २५ वर्षांपूर्वीच्या पराभवाचा बदला घेण्याची संधी भारताकडे आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात २००० साली चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेची फायनल झाली होती. सौरव गांगुलीच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या टीम इंडियाला यात पराभवाचा सामना करावा लागला होता. कर्णधार गांगुलीने या सामन्यात ११७ धावा केल्या होत्या. तर सचिन तेंडुलकरने ६९ धावांची कामगिरी केली. परंतु क्रिस कैर्न्सने १०२ धावा करून नाबाद शतक ठोकले आणि न्यूझीलंडने २ बॉल राखून सामना जिंकला.

२०१९ क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघ हा विजेतेपदाचा प्रमुख दावेदार मानला जात होता. रोहित शर्मा आणि विराट कोहलीसह सर्वच खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन केले होते. भारतीय संघाने मोठ्या दिमाखात उपांत्य फेरीत धडक मारली होती. न्यूझीलंड विरुद्धचा सामना जिंकून टीम इंडिया सहज फायनलमध्ये पोहचेल, असा अंदाज क्रिकेटप्रेमी व्यक्त करू लागले. मात्र पावसाने या सामन्यात विघ्न निर्माण केले. पावसामुळे दोन दिवस हा सामना झाला. मार्टिन गुप्तिलने महेंद्रसिंह धोनीला धावचीत केले आणि भारताचे स्वप्न भंगले. उपांत्य फेरीत उलटपेर झाला. न्यूझीलंडने भारताचा १८ धावांनी पराभव करुन फायनलमध्ये धडक मारली. संपूर्ण स्पर्धेवर वर्चस्व गाजवणाऱ्या भारताला न्यूझीलंडने स्पर्धेबाहेर काढत देशातील कोट्यवधी क्रिकेटप्रेमींना धक्का दिला होता. १४ जुलै २०१९ रोजी अंतिम सामना इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर झाला होता. हा सामना क्रिकेट इतिहासातील सर्वात रोमांचक आणि नाट्यमय सामन्यांपैकी एक ठरला. सामना टाय झाल्यानंतर सुपर ओव्हर झाली. सुपर ओव्हरही टाय झाली. अखेर इंग्लंडने अधिक चौकार मारले होते (बाउंड्री काउंट नियम), त्यामुळे इंग्लंडला विजेता घोषित करण्यात आले. बाउंड्री काउंट नियमावर मोठी चर्चा झाली, कारण हा सामना निव्वळ चौकार–षटकारांच्या आधारे ठरवण्यात आला. अशाप्रकारे न्यूझीलंडचेही विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न भंगले.

२०२१ मध्ये टी– २० विश्वचषकात स्पर्धेत टीम इंडियाला आपले अस्तित्व टिकण्यासाठी न्यूझीलंडचा पराभव करणे अनिवार्य होते; पण पुन्हा एकदा न्यूझीलंड संघ 'भिंत' म्हणून भारतासमोर उभा राहिला. न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी भारताला छोट्या धावसंख्येवर रोखले. त्यानंतर किवी फलंदाजांनी लक्ष्य सहज गाठले. या पराभवामुळे उपांत्य फेरी गाठण्याच्या भारताच्या आशाच संपुष्टात आल्या होत्या. टीम इंडियाने उर्वरित सर्व सामने जिंकले, मात्र न्यूझीलंड विरुद्धचा पराभव हाच उपांत्य फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी मुख्य अडसर ठरला आणि भारतासाठी न्यूझीलंडचा संघ पुन्हा एकदा 'व्हिलन' ठरला.

कसोटी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने धडक मारली. टीम इंडिया सवोत्कृष्ट कसोटी खेळत होती.न्यूझीलंड विरुद्धच्या अंतिम सामना १८ ते २३ जून २०२१ दरम्यान इंग्लंडच्या साउथहॅम्प्टन मधील रोझ बोल खेळवला गेला होता. न्यूझीलंडच्या रॉस टेलरने सर्वोत्कृष्ट फलंदाजीचे प्रदर्शन घडवले. न्यूझीलंडने भारताचा ८ गडी राखून पराभव करत पहिला वहिला कसोटी विश्वचषकावर आपलं नाव कोरलं होते. एकाच वर्षी सलग दोनवेळा भारताला विश्वचषकापासून लांब राहावे लागले.






चोपडे : गोवा हँडबॉल अकादमीच्या पाच दिवसीय विद्युत झोतातील गोवा हँडबॉल लीग स्पर्धेला प्रारंभ करताना आगरवाडा चोपडे सरपंच हेमंत चोपडेकर, कपिल कोरगांवकर, उमेश लिंगुडकर, यदुवीर सीमेपुरुषकर, देवेंद्र प्रभुदेसाई व अन्य मान्यवर.

# चोपडेत गोवा हँडबॉल लीग स्पर्धेला प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ६** : गोवा हँडबॉल अकादमीच्या विद्युत झोतातील ५ व्या गोवा हँडबॉल लीग स्पर्धेला चोपडे येथे उत्साहात प्रारंभ झाला. स्पर्धेचे उद्घाटन आगरवाडा चोपडे पंचायतीचे सरपंच हेमंत चोपडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी खास निमंत्रित पाहुणे म्हणून शिवोलीचे सामाजिक कार्यकर्ते कपिल कोरगावकर , उमेश लिंगुडकर,रावजी चोपडेकर, यदुवीर सीमेपुरुष्कर, केशव बुगडे, शिवोलीचे मारना पंचायतीचे पंच अमित मोरजकर, डॉ. एलरॉय पिंटो, कौशल पार्सेकर, संदीप पाटील, अनंत सावळ, गोवा हँडबॉल अकादमीचे अध्यक्ष देवेंद्र प्रभुदेसाई आदी व्यासपीठावर उपस्थितीत होते. या स्पर्धेत ६ संघांनी भाग घेतला असून ५ दिवस लीग पद्धतीने सामने खेळवण्यात येणार आहेत यात निझ स्पार्टन ( अनंत सावळ मोरजी), पार्से पँथर ( केशव बुगडे पार्से), फ्लाईंग हँडबॉलर्स ( अमित मोरजकर शिवोली), फ्रेंड्स हँडबॉलर (विघ्नेश चोडणकर), झी वोलोस लायन्स (क्लिंटन डिसोझा), लेझी बॉईज (डॉ. क्लिफटोन फर्नांडिस परा) आदी संघानी भाग घेतला आहे. या स्पर्धेचा शुभारंभी सामना फ्लाइंग हँडबॉलर्स विरुद्ध झीलोस लायन्स यांच्यात झाला.

उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत सावळ यांनी केले. देवेंद्र प्रभुदेसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ७,८,आणि ९ मार्च असे रोज सायंकाळी विद्युत झोतात स्पर्धेचे सामने होतील, असे गोवा हँडबॉल अकादमीचे अध्यक्ष देवेंद्र प्रभुदेसाई यांनी यावेळी सांगितले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १८३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 183 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .